<u>गोपनीय</u>

**क्रमांक : का.स./बैठक/२४८**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ०४ मे, २०१६

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १८ एप्रिल, २०१६ रोजी झालेल्या २४८व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

४/५/१६

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री. द. म. सुकथनकर<br>"प्रिया", वरळी सी फेस,<br>वरळी, मुंबई - ४०० ०१८. | - | सदस्य |
| श्री. ना. वि. मेराणी<br>ए/४७, आदर्श नगर,<br>वरळी, मुंबई - ४०० ०१८. | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. | - | सदस्य |
| प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

..२/-

प्रधान सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

महापालिका आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१. - सदस्य

व्यवस्थापकीय संचालक,
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१. - सदस्य

महानगर आयुक्त
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण - सदस्य

**निमंत्रित :**

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

----------xox----------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २४८वी बैठक

**दिनांक** : **१८ एप्रिल, २०१६ (सोमवार)**

**वेळ** : **दुपारी ३.३० वाजता**

**स्थळ** : **सहयाद्री राज्य अतिथीगृह,**
**बी. जी. खेर मार्ग, मलबार हिल,**
**मुंबई - ४०० ००६.**

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. स्वाधीन क्षत्रिय<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. ना. वि.मेराणी | - | सदस्य |
| श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |
| श्री. संजय देशमुख<br>अति. महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका<br>(महापालिका आयुक्त यांचे प्रतिनिधी) | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्रीमती मनिषा म्हैसकर
सचिव (२),
नगर विकास विभाग

श्री. संजय सेठी
अति.महानगर आयुक्त (१)/प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय खंदारे
अति.महानगर आयुक्त (२),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. पी. आर. के. मूर्ती
संचालक (प्रकल्प) मेट्रो,
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. प्रताप मोहिते
वित्त सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. डी. टी. ठुबे
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संपतकुमार
प्रमुख, न. व क्षे. नि. विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्रीमती के. विजयालक्ष्मी
प्रमुख, प. व द. विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क) आणि
उप महानगर आयुक्त (प्रशासन) (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय यादव
उप महानगर आयुक्त (प्रकल्प समन्वयक),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. शं. सि. देशपांडे
सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय नानावटे
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती व सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी झालेल्या २४७व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करीत असताना कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे सुचित केले की, अपर मुख्य सचिव, वित्त विभाग यांना या समितीचे कायम निमंत्रित म्हणून निमंत्रित करावे. त्यानुसार मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी कार्यकारी समितीच्या यापुढील बैठकींना अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांना 'कायम निमंत्रित' म्हणून बोलविण्यात यावे असे निर्देश दिले.

त्यानंतर, कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी झालेल्या २४७व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र. ३ : मेट्रो मार्ग-७ -अंधेरी (पूर्व) - दहिसर (पूर्व) या मेट्रो मार्गाच्या उन्नत मार्ग व स्थानकांच्या स्थापत्य बांधकामाकरीता पॅकेज क्र. १, २ व ३ अंतर्गत मागविलेल्या ई-निविदांना मंजुरी देण्याबाबत.**

३.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक व परिवहन व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा बृहत् आराखडा (Master Plan) व प्राधान्यक्रम असलेल्या मार्गांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित (DMRC) यांची नेमणूक

करण्यात आली आहे. सदर बृहत् आराखडयात एकूण ९ मेट्रो मार्गांचा समावेश असून त्यांची एकूण लांबी १४६.५ कि.मी. होती. सदर बृहत् आराखडयात चर्चगेट, छत्रपती शिवाजी टर्मिनस, मुंबई सेंट्रल, वांद्रे, कुर्ला, अंधेरी, घाटकोपर व मुलुंड या महत्वाच्या रेल्वे स्थानकांना आणि आंतरराष्ट्रीय विमानतळाला मेट्रो मार्गाने जोडण्याचे संकल्पित आहे. मुंबई मेट्रो मार्गांचे अंमलबजावणी धोरण निश्चित करतेवेळी व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना सदर बृहत् आराखडयामध्ये काही बदल करण्यात आले असून ठाणे, भिवंडी, कल्याण या शहरांना सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्था (MRTS) सेवेने जोडण्याचे प्रस्तावित आहे. सुधारित मेट्रो रेल्वे बृहत् आराखडयानुसार मेट्रो मार्गांची एकूण लांबी १७२ कि.मी.आहे. सुधारित बृहत् आराखडयातील आतापर्यंत ११.४ कि.मी. लांबीचा मेट्रो मार्ग - १ कार्यरत असून ३३.५ कि.मी. लांबीच्या मेट्रो मार्ग - ३ चे काम MMRC मार्फत राबविण्यात येत आहे. दिनांक २० मे, २०१५ रोजी झालेल्या वॉर रुम (War Room) बैठकीत झालेल्या निर्णयावर आणि दिनांक २६ जून, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशांनुसार एकूण ११८ कि.मी. उन्नत मेट्रो मार्गांची तपासणी करण्याकरीता तसेच त्यांचे पुनर्विलोकन, अद्ययावतीकरण व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित (DMRC) यांची प्राधिकरणामध्ये सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्याप्रमाणे प्राधिकरणाने आणि राज्य शासनाने ११८ कि.मी. लांबीच्या उन्नत मेट्रो मार्गाच्या आराखडयास मान्यता दिलेली आहे. तसेच DMRC यांनी मेट्रो मार्ग ७ साठी अंदाजीत केलेल्या रु.४१८३.०० कोटी (सन २०१५ भावपातळी नुसार, करासहीत) मूळ किंमतीच्या खर्चास प्राधिकरणाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. केंद्र शासनाच्या शहर विकास मंत्रालय व DEA यांनी एशियन डेव्हलपमेंट बँकेकडून मेट्रो मार्ग-२ (अ) साठी रु.२८०३ कोटी व मेट्रो मार्ग-७ साठी रु.२२४६.०० कोटी रुपयांचे अर्थसहाय्य घेण्यास तत्वतः मान्यता दिलेली आहे. मेट्रो मार्ग ७-अंधेरी (पूर्व)-दहिसर(पूर्व) या प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या पहिल्या टप्प्याअंतर्गत उन्नत मार्ग व स्थानकांचे बांधकाम करणेसाठीच्या निविदा DMRC द्वारा सादर करण्यात आल्या. प्राधिकरणातर्फे मुंबई शहराची भौगोलिक परिस्थिती तसेच गरजा लक्षात घेऊन निविदेत योग्य त्या शिफारशी करण्यासाठी बांधकाम विभागाचे निवृत्त सचिव व रेल्वेचे निवृत्त मुख्य अभियंता यांची समिती गठीत करण्यात आली होती. समितीच्या शिफारशींचा अंतर्भाव DMRC तर्फे निविदेत करण्यात आला आहे. या प्रकल्पाची व्याप्ती व जलद गतीने अंमलबजावणीसाठी तीन पॅकेजमध्ये विभागणी करुन DMRC यांनी अंदाजपत्रके प्राधिकरणास सादर केली.

..५/-

३.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मेट्रो मार्ग - ७ च्या पॅकेज १,२ व ३ च्या स्थापत्य बांधकामाकरिता ई-निविदा मागविण्यासाठी टाईम्स ऑफ इंडिया (सर्व आवृत्ती), लोकमत व नवाकाळ या वृत्तपत्रांत दिनांक १७ व १८ डिसेंबर, २०१५ रोजी ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. निविदा प्रक्रियेदरम्यान मेट्रो मार्ग-२ व ७ मार्गांची जोडणी करण्याची आवश्यकता लक्षात घेता, त्यांचे एकत्रिकरण (Interoperability) करण्याचे निर्देश प्राधिकरणाने DMRC यांना दिले. तसेच महापालिका, महानगर गॅस, वाहतूक विभाग, टाटा पॉवर, बेस्ट, बांधकाम खाते व इतर विभागांसोबत केलेल्या संयुक्त पाहणी दरम्यान निदर्शनास आल्यानुसार मार्गात काही बदल करणे आवश्यक होते. या बाबी लक्षात घेता, मेट्रो मार्ग - ७ च्या पॅकेज १, २ व ३ च्या लांबी व स्थानकांच्या संख्येत काही बदल झाले. त्यानुसार, DMRC यांनी सुधारित अंदाजपत्रके सादर केली. निविदेच्या पॅकेज-१ साठी सुधारित रक्कम रु. ४१०.० कोटी, पॅकेज-२ साठी रु.४०६.७३ कोटी व पॅकेज-३ साठी रु. २७७.०८ कोटी इतकी करण्यात आली. कामाच्या व्याप्तीत झालेले बदल लक्षात घेता, ई-निविदा सादर करण्याचा कालावधी दिनांक २४ फेब्रुवारी, २०१६ पर्यंत वाढविण्यात आला. त्याप्रमाणे दिनांक १९ फेब्रुवारी, २०१६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत ई-निविदांची विक्री करण्यात आली. पॅकेज-१ साठी ११, पॅकेज २ साठी १० व पॅकेज-३ साठी ११ ई-निविदांची खरेदी इच्छुक कंत्राटदारांमार्फत करण्यात आली. दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६ रोजी सायं. ४.०० वाजता लिफाफा 'अ' (इसारा ठेव) व 'ब' (तांत्रिक) उघडण्यात आले. खालील निविदाकारांनी ई-निविदा सादर केल्या :-

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | ई निविदा सादर करण्यात आल्या | | |
|---|---|---|---|---|
| | | पॅकेज - १ | पॅकेज - २ | पॅकेज - ३ |
| १ | मे. सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. | √ | √ | √ |
| २ | मे. आय.इ.सि.सि.एल. | √ | √ | √ |
| ३ | मे. एल ॲण्ड टी लिमिटेड | √ | √ | X |
| ४ | मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | √ | √ | √ |
| ५ | मे. एन.सी.सी.लिमिटेड | X | X | √ |
| ६ | मे. रेलकॉन-मिशिगन-सिव | X | X | √ |
| | एकूण | ०४ | ०४ | ०५ |

ई-निविदांच्या पात्रतेची व तांत्रिक छाननी DMRC मार्फत करण्यात येऊन त्याचा अहवाल प्राधिकरणास दिनांक २९ मार्च, २०१६ रोजी सादर केला. तांत्रिकदृष्टया पात्र निविदाकारांचे वित्तिय लिफाफे (लिफाफा-क) अनियत पध्दतीने पॅकेज १, २ व ३ साठी दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी उघडण्यात आले. उघडलेल्या सर्व ई-निविदांची छाननी DMRC मार्फत करण्यात आली व तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे :-

| अ. क्र. | कंत्राटदाराचे नाव | पॅकेज - १(कोटी) | | पॅकेज - २(कोटी) | | पॅकेज - ३(कोटी) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | निविदेची रक्कम | प्राप्त रक्कम | निविदेची रक्कम | प्राप्त रक्कम | निविदेची रक्कम | प्राप्त रक्कम |
| १ | मे. सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. | | **३४८.३० (लघुत्तम)** | | # | | # |
| २ | मे.आय.इ.सि.सि.एल | | ४१४.५६ | | ४०२.८६ | | २८२.२९ |
| ३ | मे. एल अँण्ड टी लिमिटेड | ४१०.०० | ४८२.५० | ४०६.७३ | ४७२.६० | २७७.०८ | लागू नाही |
| ४ | मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | | ३६६.८५ | | **३६०.२१ (लघुत्तम)** | | # |
| ५ | मे.एन.सी.सी.लिमिटेड | | लागू नाही | | लागू नाही | | **२४९.८६ (लघुत्तम)** |

**# निविदेतील अटींप्रमाणे वित्तीय लिफाफा उघडण्यात आला नाही.**

३.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, वरील सर्व बाबींचा विचार करता **पॅकेज-१** मध्ये मे.सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांच्या अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा (-) १५.१% कमी रु.३४८.३० कोटी रक्कमेचा देकार लघुत्तम आहे. **पॅकेज-२** मध्ये मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि.यांच्या अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा (-) ११.४% कमी रु.३६०.२१ कोटी रक्कमेचा देकार लघुत्तम असून **पॅकेज-३** मध्ये मे.एन.सी.सी.लिमिटेड यांच्या अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा (-) ९.८% कमी रु.२४९.८६ कोटी रक्कमेचा देकार लघुत्तम आहे. वरील तीनही देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे, सुसंवादी व रास्त असल्याने कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

३.४ यावर चर्चा करतांना मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी पॅकेज-३ मधील मे.रेलकॉन-मिशिगन-सिव (JV) यांना अपात्र का ठरविण्यात आले याची विचारणा केली. यावर महानगर आयुक्त यांनी खुलासा केला की, सदर निविदाकारास तांत्रिकदृष्टया कामाचा हवा असलेला अनुभव नसल्याने DMRC नी त्यांची निविदा अपात्र ठरविल्याचे सुचविले. मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी,

सदर निवड निविदाकारांच्या अनुभव व क्षमतेबद्दल विचारणा केली असता संचालक (प्रकल्प)-मेट्रो यांनी असे सांगितले की, या तिन्ही निविदाकारांचा पूर्वीचा मेट्रो प्रकल्पाचा अनुभव व क्षमता यांचा विचार करण्यात आलेला आहे. तसेच वरील तिन्ही निविदा रास्त व वाजवी आहेत.

**निर्णय :** **चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजुर केला :-**

**ठराव क्र. १३०० :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन), अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे पॅकेज-१ साठी मे.सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांच्या अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा रु.३४८.३० कोटी (-१५.१% कमी) रक्कमेचा लघुत्तम देकार, पॅकेज-२ साठी मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांच्या अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा रु.३६०.२१ कोटी (-११.४% कमी) रक्कमेचा लघुत्तम देकार, तसेच पॅकेज-३ मध्ये मे.एन.सी.सी.लिमिटेड यांच्या अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा रु.२४९.८६ कोटी (-९.८% कमी ) लघुत्तम देकार या तिन्ही ई-निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ४ :** **प्राधिकरणाव्दारे स्मार्ट बीकेसी प्रकल्प राबविण्याच्या निविदेस मान्यता मिळण्याबाबत.**

४.१ या प्रस्तावाविषयी माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १३८व्या बैठकीत स्मार्ट वांद्रे-कुर्ला संकुल हा प्रकल्प राबविण्यास प्राधिकरणाने प्रशासकीय मान्यता दिली असून या प्रकल्पातील ICT उपक्रमांतर्गत एकूण ७ घटक खालील प्रमाणे आहेत :-

(i) Wi-Fi उपक्रम
(ii) Smart Parking उपक्रम

..८/-

(iii) Citizens App
(iv) Integrated Building Monitoring System (IBMS)
(v) Command and Control Center
(vi) Energy Efficient Street Lights (Through EESL, GoI)
(vii) CCTV प्रकल्प (Through Home Department, GoM)

४.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगीतले की, वरीलपैकी १ ते ५ घटक प्राधिकरणाकडून स्मार्ट बीकेसीच्या निविदेद्वारे राबविले जात असून घटक क्र.६ (LED Street Light) मध्ये सोडीयम दिव्याऐवजी LED दिवे लावण्याचे प्रयोजन आहे. तसेच हे काम केंद्र शासन संस्थेकडून (EESL) ठेव काम पध्दतीवर करावयाचे आहे. घटक -७ (CCTV) चे काम राज्य शासनाच्या गृह विभागाने नेमणूक केलेल्या संस्थेकडून ठेव पध्दतीवर करण्यात येणार आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमूद केले की, वरील घटक क्र. १ ते ५ करिता प्राधिकरणाने RFP (निविदा) तयार करुन दिनांक १५ जुलै, २०१५ रोजी ई-निविदेद्वारे नोटीस प्रसिध्द केली व दिनांक १५ जुलै, २०१५ रोजी अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांचे अध्यक्षतेखाली निविदा मुल्यमापन समितीची (BEC) स्थापना केली. सदर निविदा मुल्यांकन समितीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे संचालक, मा.मुख्यमंत्री कार्यालयातील OSD, IIT Bombay मधील Head for Urban Science and Engineering, Vice President NASSCOM व KPMG चे Partner यांचा सुध्दा सदस्य म्हणून समावेश असल्याचे नमूद केले.

**Table 1 Bid Evaluation Committee :- (निविदा मुल्यमापन समिती)**

| Names of Committee members | | Organization | |
|---|---|---|---|
| 1 | Additional Metropolitan Commissioner-1, | MMRDA | Chairperson |
| 2 | Financial Advisor, | MMRDA | Member |
| 3 | Chief, Town & Country Planning, | MMRDA | Member |
| 4 | Dy.Metropolitan Commissioner (Lands) | MMRDA | Member |
| 5 | Joint Project Director (TP) / IT Incharge | MMRDA | Convener |
| 6 | Director, IT or his representative/ GoM | DIT, GoM | Expert |
| 7 | Officer on Special Duty (OSD) to the Hon'ble CM, GoM | GoM | Expert |
| 8 | Prof. KrithiRamamritham, Head, Centre for Urban Science and Engineering,IIT Bombay | IIT Bombay | Member |
| 9 | Vice President, West- NASSCOM | NASSCOM | Member |
| 10 | Mr. Ramendra Verma, Partner, IGS, M/s. KPMG | KPMG | Member |

४.३ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांना या विषयासंदर्भात सादरीकरण करावयास सांगीतले. सादरीकरणादरम्यान अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी असे सांगीतले की, सदर प्रकल्प प्रामुख्याने ३ भागांमध्ये राबविण्याचे प्रयोजन करण्यांत आले आहे. अ) ICT ब) Non ICT उपक्रम क) Urban Design उपक्रम. अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी या निविदा प्रक्रियेबद्दल सांगताना पुढे असे नमूद केले की, निविदापूर्व बैठक (Pre Bid Meeting) दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजी संपन्न झाली व त्यास चांगला प्रतिसाद प्राप्त होऊन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या सुमारे ३० कंपन्यांनी यात सहभाग घेतला होता. तसेच निविदा सादर करण्यासाठीच्या अंतिम तारखेपर्यंत म्हणजेच दिनांक ०२ नोव्हेबर, २०१५ रोजी खालील दोन निविदा प्राप्त झाल्या. निविदा प्रक्रियेमध्ये तीन टप्पे असून टप्पा-१ (Envelope A- Eligibility), टप्पा-२ (Envelope-B-Technical Proposal) व टप्पा-३ (Envelope-C-Financial Proposal) यामध्ये QCBS प्रक्रिया आहे. (७०% Technical weightage व ३०% financial weightage) Technical score चा cutoff ८०% म्हणजेच ८०% पेक्षा जास्त गुण मिळणारा निविदाकार या प्रक्रीयेमध्ये Financial Envelope-'C' उघडण्यासाठी पात्र झाला आहे. निविदा मधील ५ घटकांबद्दल त्यांनी थोडक्यात माहिती दिली.

४.४ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी पुढे अशी माहिती दिली की, प्रकल्पाचा एकूण कालावधी जरी ७ वर्षे असला तरी प्रथम २ वर्षे ही सर्व सिस्टीम स्टेबल होण्यासाठी तसेच त्यातून मिळणारे पूर्ण उत्पन्न निविदाकारास प्रोत्साहन म्हणून प्रायोजित आहे. पुढील ५ वर्षाच्या उत्पन्नापैकी ७५ टक्के उत्पन्न प्राधिकरणास अपेक्षित असून २५% टक्के उत्पन्न निविदाकारास मिळेल. या निविदेच्या अटी व शर्तीप्रमाणे निविदाकारास Escrow account उघडावा लागेल. वर उल्लेखित खर्च Capex व Opex ७ वर्षासाठी प्राधिकरण निविदाकारास अदा करणार आहे. एकूण रक्कमेच्या ४० टक्के ६ महिन्यात व ६० टक्के रक्कम पुढील ७ वर्षासाठी २८ समान हप्त्यामध्ये देण्यात येणार आहे. निविदाकार एकूण रक्कमेच्या १०% रक्कमेची बँक गॅरंटी प्राधिकरणास देईल. प्राप्त २ निविदाकारांची माहिती खालील प्रमाणे आहे :-

**Table-2: Bidders list for tender No.276 Smart BKC 1.0**

| Sr.No. | Lead Bidder | Consortium Members |
|---|---|---|
| 1 | Larsen & Toubro Ltd. | Building Control Solutions Private Ltd. |
| | | CMS Computers Pvt. Ltd. |
| | | VLink Systems Pvt. Ltd. |
| 2 | Reliance Infrastructure Ltd. | Reliance Communication Ltd. |
| | | Tech Mahindra Ltd. |
| | | SKIDATA (India) Pvt. Ltd. |

४.५ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी पुढे अशी माहिती दिली की, निविदाकाराने लखोटा -अ मध्ये सादर केलेल्या कागदपत्रावरुन सल्लागारामार्फत मुल्यमापन करण्यात आले व निविदाकाराकडून त्यांनी सादर केलेल्या माहितीसंदर्भात स्पष्टीकरण मागविल्यानंतर सदर स्पष्टीकरणाच्या आधारे प्राधिकरणाच्या ई-प्रशासन सल्लागाराने निविदा लखोटा-अ बाबतचा मुल्यमापन संदर्भातील आपला अहवाल दिनांक १६ नोव्हेंबर, २०१५ रोजी प्राधिकरणास सादर केलेला आहे. प्राधिकरणाच्या निविदा मुल्यमापन समितीने दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी दोन्ही निविदाकारांनी दिलेले स्पष्टीकरण व ई- प्रशासन सल्लागाराच्या निविदेसंदर्भातील अहवालाचे अवलोकन करुन दोन्ही निविदाकारांचे (M/s. Larsen and Toubro Ltd. and M/s. Reliance Infrastructure Ltd.,) प्रस्ताव पात्र ठरविले आहेत. दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५ रोजी दोन्ही निविदाकार यांनी सादर केलेले "लखोटे - ब" उघडण्यात येऊन दोन्ही निविदाकारांनी दिनांक ०१ डिसेंबर रोजी केलेले सादरीकरण व दिनांक १७ डिसेंबर व १८ डिसेंबर, २०१५ रोजी प्राधिकरणाने सांगितलेल्या एकूण ५३ Usecases च्या आधारे सदर बाबतचे प्रात्यक्षिके (PoC) BEC members पुढे सादर केले असून या POC द्वारे निविदाकारांनी प्रस्तावित केलेल्या Technology ची प्रात्यक्षिक सादर केली. तसेच Command Centre ही स्थापन करुन Command Centre वरुन प्रस्तावित केलेल्या सर्व घटकांवर नियंत्रण करता येते याचे प्रात्यक्षिक दाखविले.

४.६ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी पुढे असे सांगीतले की, दोन्ही निविदाकारांनी सादर केलेले लखोटे 'अ' व 'ब' यातील कागदपत्रे, सादरीकरण, Proof of Concept, वेळोवेळी मागविण्यात आलेले स्पष्टीकरण व त्यांनी दिलेला प्रतिसाद इत्यादींच्या आधारे ई-प्रशासन सल्लागाराने तांत्रिक मुल्यमापन पूर्ण करुन त्यांचा अहवाल दिनांक १८ जानेवारी, २०१६ रोजी प्राधिकरणास सादर केला व हा अहवाल प्राधिकरणाच्या निविदा मुल्यमापन समितीने दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये स्विकारला असून वरील दोन्ही निविदाकारांनी ८० पेक्षा जास्त गुण प्राप्त केल्यामुळे ते निविदा अटीप्रमाणे लखोटा 'क' उघडण्यासाठी पात्र ठरले.

**Table 3: Summary of Technical Evaluation – (TE-1 to TE-11) – Total 100 marks**

| S.No. | Technical Evaluation Criterion | Max Weighted Marks | Min Qualifying Marks | L&T Ltd. | Reliance Infrastructure Ltd. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Weighted Marks | Weighted Marks |
| Total Marks- TE-1 to TE-11 ( Max Weighted Marks- 100 ) | | 100 | 80 | 95.93 | 89.77 |

..११/-

तसेच दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजी दोन्ही निविदाकारांच्या आर्थिक प्रस्तावाचा लखोटा 'क' (Envelope 'C') उघडण्यात आला व त्याची माहिती खालील तक्ता क्र. ४ मध्ये देण्यात आली आहे:

**Table 4: Smart BKC 1.0 Financial Bid Offers**

| Bidder Name | Capex Expenditure (in INR) | Present Value (PV) of Operating Expenditure (in INR) | Grand Total (in INR) |
|---|---|---|---|
| | A | B | C=A+B |
| **Larsen & Toubro Ltd.** | 43,95,82,497 | 63,75,14,651 | **107,70,97,148** |
| **Reliance Infrastructure Ltd.** | 50,00,00,000 | 25,00,00,000 | **75,00,00,000** |

त्याचप्रमाणे निविदेतील कलम ४.५ अन्वये प्राप्त आर्थिकबोली व तांत्रिकबोली यांचे संमिश्र गुण (Composite score) खालील तक्त्यांत दाखविण्यात आले आहेत.

**Table 5: Summary of Composite Score for Both Qualified Bidders**

| Bidder | Technical Marks (Actual Objective Marks) | Relative Technical Score | Weighted Technical Score | Financial Bid (INR Crore) | Relative Financial Score | Weighted Financial Score | Compo-site Score |
|---|---|---|---|---|---|---|---|
| *Formula* | *A* | *B-100* (Technical Marks/ Highest Technical Marks)* | *C=B x 70%* | *D* | *E = 100 (Lowest Bid/Bid)* | *F=E x 30%* | *G=C+F* |
| M/s.Larsen and Toubro Ltd. | 95.93 | 100.00 | 70.00 | 107.71 | 69.63 | 20.89 | 90.89 |
| M/s. Reliance Infrastructure Ltd. | 89.77 | 93.58 | 65.51 | 75.00 | 100.00 | 30.00 | 95.51 |

४.७ अति. महानगर आयुक्त (१) यांनी पुढे असे नमूद केले की, निविदा मुल्यांकन समितीने निविदा प्रस्ताव, निविदेस मिळालेला प्रतिसाद, निविदाकाराकडून प्राप्त झालेले स्पष्टीकरण, सल्लागाराने सादर केलेले अहवाल इ. चा विचार करुन त्यांचा अहवाल पुढील शिफारसीसह महानगर आयुक्त यांना दिनांक २५.०२.२०१६ रोजी सादर केला आहे :-

१) सल्लागाराने सादर केलेला सर्व अंतरिम व अंतिम अहवाल स्विकारणे.

२) निविदा प्रस्तावातील भाग-१ कलम ४.५ नुसार M/s. Reliance Infrastructure Ltd. यांना सर्वात जास्त Composite Score मिळाल्याने हे Most Responsive निविदाकार म्हणून स्विकारण्यात यावे. सदर निविदेचे नक्त वर्तमान मुल्य रु.७५ कोटी (रु.५० कोटी Capex + P.V. रु.२५ कोटी Opex) आहे.

३) तांत्रिक प्रस्ताव व आर्थिक प्रस्ताव यातील परिमाणांच्या संख्येमध्ये जर फरक आला तर दोन्ही पैकी जी परिमाणे जास्त आहेत त्यानुसार M/s. Reliance Infrastructure Ltd., यांना काम करावयाचे आहे व त्यासाठी कोणताही अधिक मोबदला त्यांना मिळणार नाही याबाबत प्राधिकरणाने खात्री करावी.

४) दिनांक २२.०२.२०१६ रोजी M/s. Reliance Infrastructure Ltd., यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात नमूद केल्याप्रमाणे मनुष्यबळाच्या हुद्दा व संख्येनुसार या प्रकल्पावर नेमणूक करण्याबाबत प्राधिकरणाने खात्री करावी.

५) प्राधिकरणाने M/s. Reliance Infrastructure Ltd., ला जो (Letter of Intent) द्यावयाचा आहे त्यामध्ये असा उल्लेख करावा की, निविदाकाराने सादर केलेल्या सर्व स्पष्टीकरणाचा समावेश प्राधिकरणाबरोबर होणाऱ्या करारनामामध्ये केला जाईल.

६) निविदा प्रस्तावातील भाग-१ कलम क्र. ४.६.६ नुसार निविदाकार M/s.Reliance Infrastructure Ltd., यांनी रु. ७.५ कोटीची बँक गॅरंटी सादर करावयाची आहे. निविदाकारानी मनुष्यबळापोटीचा अंदाजे रु. १२.९५ कोटी खर्च मिळणाऱ्या उत्पन्नाच्या स्त्रोतातून करण्याचे प्रस्तावित केले आहे. याकरिता M/s.Reliance Infrastructure Ltd यांनी स्वतःच्या स्त्रोतातून सदर रक्कम उभारण्याच्या जोखिमेपोटी त्यांच्याकडून रु. ५.५० कोटीची बँक गॅरंटी घेण्यात यावी.

..१३/-

७) स्पष्टीकरणानंतर प्राप्त झालेले युनिट रेट हे अतिरिक्त कामासाठी वा बदली कामासाठी धरण्यात येऊ नयेत. निविदा प्रस्तावातील भाग-१ च्या कलम नं.३.७.४.१ उपकलम क्र.९ अन्वये प्रकल्प कार्यान्वीत झाल्यानंतर गरज भासल्यास अतिरिक्त कामासाठी प्राधिकरणाकडून बाजारातील प्रचलित असलेल्या दराबाबत वाटाघाटी करुन अंतिम दर निश्चित करावेत.

८) बृहत करार (Master Agreement):- निविदाकार M/s.Reliance Infrastructure Ltd., यांच्याबरोबर करावयाचा बृहत करार मसुदा व्यावसायिक, निष्णांत विधी कंपनीकडून तयार करुन घ्यावा व त्यात निविदा प्रस्ताव, मानक विचलन संच (Standard Set of Deviation), M/s.Reliance Infrastructure Ltd., यांनी सादर केलेले स्पष्टीकरण, तसेच ई-प्रशासन सल्लागाराने दिलेला निरिक्षण अहवाल इ. बाबींचा निविदाकाराबरोबर करावयाच्या कराराचा अविभाज्य भाग असेल.

**सादरीकरणानंतर सदर प्रस्तावावरील चर्चेदरम्यान खालील प्रमाणे सूचना करण्यात आल्या :-**

१. मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, सदर प्रकल्पातील Command and Control Center मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना कागदपत्रे तपासणीसाठी Access असावा. तसेच प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी मागणी केलेली माहिती निविदाकाराने पुरवावी व सदर बाबतचा समावेश प्राधिकरणाबरोबर होणाऱ्या निविदाकाराच्या करारनाम्यामध्ये करण्यात यावा. तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागातर्फे अजून काही compliance लागणार आहे का याची खात्री करावी असे निर्देश दिले.

२. कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे नमूद केले की, सादरीकरणादरम्यान निविदाकाराने निविदेत सादर केलेली रक्कम Capex रु. ५० कोटी व Opex रु.२५ कोटी याबद्दल सकृत दर्शनी असे वाटते की, Capex च्या प्रमाणात Opex हा कमी दिसून येत आहे. यावर अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी असे स्पष्टीकरण दिले की, ही बाब प्राधिकरणाच्या e-governance सल्लागाराने निविदा मुल्यमापन समितीच्या लक्षात आणून दिली व त्यांनी याबाबत निविदाकाराकडून स्पष्टीकरण मागविले होते. त्यावर निविदाकाराने असे स्पष्टीकरण दिले

की, प्राधिकरणाच्या निविदेमध्ये या प्रकल्पावर होणाऱ्या खर्चापोटी, प्राधिकरण निविदाकाराला Capex व Opex ची संपूर्ण रक्कम देणार आहे. त्याचप्रमाणे या प्रकल्पातून प्राप्त होणाऱ्या एकूण उत्पन्नापैकी निविदाकाराला प्रोत्साहन म्हणून एकूण उत्पन्नाच्या २५ टक्के रक्कम मिळणार आहे व या प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाच्या २५ टक्के रक्कमेमधून निविदाकार काही रक्कम ही O & M वर खर्च करणार असल्याने या रक्कमेबाबत निविदाकाराने प्राधिकरणाला सादर केलेल्या बोलीमध्ये ही रक्कम ग्राह्य धरली आहे. जरी निविदेमधील O & M ची रक्कम कमी दिसत असली तरी प्रत्यक्षात O & M वर होणारा खर्च व निविदेत O & M साठी धरलेला खर्च यातील प्रत्यक्षातील फरकापोटी येणारा खर्च हा निविदाकार त्याला उत्पन्नापोटी मिळणाऱ्या रक्कमेतून खर्च करणार आहे. जरी हे निविदेस धरुन असले तरी निविदाकाराला आपल्या उत्पन्नातून करावयाच्या अधिक खर्चाच्या रक्कमेपोटी निविदाकाराकडून अतिरिक्त बँक गॅरंटी' घेण्याची शिफारस निविदा मुल्यमापन समितीने प्राधिकरणास केली आहे. ही निविदा Cost + Incentive स्वरुपाची आहे. व निविदा स्पर्धात्मक करण्यासाठी निविदाकाराने त्याच्या Incentive मधील काही रक्कम प्रकल्प खर्च (cost) कमी करण्यासाठी वापरणे हे निविदेच्या तत्वाला धरुन आहे. अतिरिक्त महानगर आयुक्त-१ यांनी पुढे असे स्पष्ट केले की, Revenue बाबत निश्चित स्वरुपात सांगणे आव्हानात्मक आहे कारण अशा प्रकारचा प्रकल्प प्रथमच होत आहे. वरील स्पष्टीकरण कार्यकारी समितीने स्विकारले व हा प्रकल्प यशस्वीरित्या लवकर पूर्ण करण्यास सांगितले.

३. त्याचप्रमाणे कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी अशीही विचारणा केली की, या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी DIT च्या नियमांचे पालन केले आहे का? यावर अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी असे निदर्शनास आणून दिले की, दिनांक ०३ मे, २०१४ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे प्राधिकरणाने हा उपक्रम राबवावयाचा आहे असा उल्लेख केला आहे व त्याप्रमाणे प्राधिकरणाच्या १३८व्या बैठकीमध्ये मान्यता प्राप्त आहे. संचालक, माहिती व तंत्रज्ञान हे निविदा मूल्यमापन समितीचे सदस्य आहेत. तरीही माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या याबाबतच्या संबंधित निर्देश / सुचनांचे पालन करण्यात येत आहे. याबाबत पुन्हा शहानिशा केली जाईल.

४. श्री. एन.व्ही. मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, प्रकल्प अंमलबजावणी करत असताना त्यातून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचे ठराविक कालावधीनंतर Third Party Audit करुन घेण्यात यावे जेणेकरुन उत्पन्नाचा ठोकताळा राहील.

४.८ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी अशा प्रकारचा प्रकल्प प्रथमच होत असल्याने व अंदाजपत्रक करतेवेळी कोणतीही Baseline नसल्याने हा प्रथमच तयार होणारा प्रकल्प आहे असे नमूद केले. या प्रकल्पातून केंद्र व राज्य शासनाला Smarty City साठी Model विकसित करणे शक्य होणार आहे. केंद्र शासनाने प्राधिकरणाचे हे Engagement Model व RFP यांची प्रशंसा केली असून ती बाकी सर्व प्रकल्पांना कशी राबवता येईल याबाबत प्राधिकरणाबरोबर चर्चा चालू आहे. भारतातील हा प्रथमच IOT प्रकल्प आहे व वरील ५ घटकांबरोबर घटक क्र. ६ व ७ राबविल्यानंतर व e-buses प्रकल्प राबविल्यानंतर Smart BKC हा भारतातील पहिला IOT प्रकल्प असेल, ज्यामध्ये हे ८ घटक IOT तर्फे एकमेकांशी जोडले गेले असतील. वरील नमूद केल्याप्रमाणे व भारतामध्ये हा नाविन्यपूर्ण प्रकल्प होत असल्याने व यामुळे BKC चे Global स्थान उंचावणार असल्याने, तसेच बाब टिप्पणीत नमूद केलेले स्पष्टीकरण व बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे सादरीकरणातील बाबी कार्यकारी समितीने विचारात घेऊन परिच्छेद क्र. ४.७ मधील शिफारसी (१ ते ८) मान्य करुन M/s. Reliance Infrastructure Ltd. या Highest Composite Score निविदाकाराची रु. ७५ कोटी (रु.५० कोटी Capex + P.V. रु. २५ कोटी Opex) किंमतीची निविदा ते यशस्वी निविदाकार ठरत असल्याने ती स्विकारण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजुर केला :-**

**ठराव क्र. १३०१ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उप कलम (३) चे पोट कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन निविदा प्रस्तावातील भाग-१ कलम ४.५ नुसार M/s. Reliance Infrastructure Ltd. यांनी प्राधिकरणास सादर केलेल्या निविदेस सर्वात जास्त Composite Score मिळाल्याने व ते यशस्वी निविदाकार ठरत असल्याने M/s.Reliance Infrastructure Ltd. यांची रु. ७५ कोटी (रु.५० कोटी Capex + P.V. रु. २५ कोटी Opex) या किंमतीची निविदा स्विकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** बाब टिप्पणीतील परिच्छेद क्र.१० मध्ये नमूद केलेल्या शिफारसी क्र. १ ते ८ च्या अधिन राहून व वरील उक्त सूचनांचे पालन करण्याचे अधीन राहून हा प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यासाठी व आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ५ : वांद्रे-कुर्ला संकुल तसेच वडाळा अधिसूचित क्षेत्र येथील नियोजित इमारतींना भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडून अधिक उंची मंजूर करण्याकरीता इंटरनॅशनल सिव्हिल एव्हिएशन ऑर्गनाईझेशन (ICAO) मार्फत करावयाच्या एअरोनॉटीकल स्टडीच्या (Aeronautical Study) शुल्कापोटी अदा करण्यात आलेल्या रक्कमेसाठी कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी", "जी-एन" व "जी-टेक्स्ट" ब्लॉक तसेच वडाळा अधिसूचित क्षेत्रातील ग्लोबल ४.०० इतका चटई क्षेत्र निर्देशांक संपूर्णतः वापरणे गरजेचे आहे व त्यासाठी या क्षेत्रांमध्ये अधिक उंच इमारतींचे बांधकाम होणे अपरिहार्य आहे. तसेच या क्षेत्रातील इमारतींना अधिक उंची मिळावी यासाठी प्राधिकरणाने भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांना एअरोनॉटीकल स्टडी (Aeronautical Study) करण्याकरीता दिनांक २४ जानेवारी, २०१३ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुल येथे ५१ मीटर ते ६० मीटर व वडाळा अधिसूचित क्षेत्र येथे १३६ मीटर ते १५४ मीटर एवढी इमारतींची उंची अनुज्ञेय केली आहे.

५.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुल तसेच वडाळा अधिसूचित क्षेत्र येथील ४.०० एवढा चटई क्षेत्र निर्देशांक पुर्णतः वापरण्याकरीता इमारतींची वरीलप्रमाणे वाढीव उंची देखील अपुरी आहे. त्यामुळे या अनुषंगाने दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी दिल्ली येथे भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या बैठकीत या क्षेत्राकरीता इंटरनॅशनल सिव्हिल एव्हिएशन ऑर्गनाइझेशन (ICAO) मार्फत एअरोनॉटीकल स्टडी करण्याचे ठरले. त्यानुसार, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्यात करार झाला असून त्याची अंतिम प्रत भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांची सही होऊन प्राप्त झाली आहे. सदर करारानुसार प्राधिकरणाने भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास सदर एअरोनॉटीकल स्टडीच्या शुल्कापोटी

USD ८,५०,६२० + INR २,००,०७३/- म्हणजेच एकूण रु.५,७७,३१,७५७/- एवढी रक्कम दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१६ रोजी अदा केली आहे. त्यामुळे, भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास एअरोनॉटीकल स्टडीची रक्कम तातडीने भरणा करावयाची असल्यामुळे त्याकरीता एकूण रु. ५,७७,३१,७५७/- एवढया खर्चास कार्यकारी समितीची कार्योत्तर मान्यता मिळावी, अशी विनंती करण्यात येत आहे.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजुर केला :-**

**ठराव क्र. १३०२ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांना वांद्रे-कुर्ला संकुल व वडाळा अधिसूचित क्षेत्र येथील इमारतींना अधिक उंची मिळावी याकरीता इंटरनॅशनल सिव्हिल एव्हिएशन ऑर्गनाइझेशन (ICAO) मार्फत करावयाच्या एअरोनॉटीकल स्टडीच्या (Aeronautical Study) शुल्कापोटी भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाला (AAI) अदा करण्यात आलेल्या एकूण रु. ५,७७,३१,७५७/- एवढया खर्चास कार्योत्तर मान्यता देत आहे."

**बाब क्र. ६ :** **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग हे पद पदोन्नतीने भरण्यास कार्योत्तर मंजूरी देण्याबाबत.**

६.१ या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या ठराव क्र.१३३८ अन्वये मेट्रो प्रकल्पाकरीता प्राधिकरणाच्या आस्थापनेवर "संचालक (प्रकल्प) मेट्रो" असे पद निर्माण करण्यात आले आहे. सदर पदावर श्री.पी.आर.के. मूर्ती, प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांना दिनांक ११.१२.२०१५ रोजी पदोन्नती देण्यात आली. त्यामुळे प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग हे पद दिनांक ११ डिसेंबर, २०१५ पासून रिक्त झाले होते. प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग हे पद विभाग प्रमुखाचे पद असल्याने सदर पदावर नेमणूक करावयाचे अधिकार कार्यकारी समितीला आहेत.

६.२ प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार सदर पद वरिष्ठ परिवहन नियोजक संवर्गातून पदोन्नतीने भरण्याची तरतूद आहे. परंतू उपरोक्त सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आले, त्यावेळी प्राधिकरणामध्ये अतिरिक्त प्रमुख हे पद अस्तित्वात नव्हते तद्नंतर, अति.प्रमुख (परिवहन) व अति.प्रमुख (उमटा) ही २ पदे निर्माण करण्यात आली असल्यामुळे प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग हे पद पदोन्नतीने भरण्याकरीता अति.प्रमुख, आणि वरिष्ठ परिवहन नियोजक या संवर्गातील पदोन्नतीच्या विचार क्षेत्रातील अधिकाऱ्यांचा पदोन्नतीसाठी विचार करण्यात आला. सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार श्रीमती के. विजयालक्ष्मी, अति. प्रमुख (उमटा) हया आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता तसेच त्यांचा परिवहन क्षेत्रामधील १५ वर्षाचा अनुभव पूर्ण करीत असल्याने विभागीय पदोन्नती समितीच्या दिनांक ०४ मार्च, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत समितीने श्रीमती. के. विजयालक्ष्मी, अति. प्रमुख (उमटा) यांना प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदावर पदोन्नती देण्याची शिफारस विभागीय पदोन्नती समितीने केलेली आहे. या पदावरील सेवा भरती पदोन्नतीने करावयाची असल्याने या पदोन्नतीस कार्यकारी समितीची मंजूरी आवश्यक होती.

६.३ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदाचे प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०७ मे, १९९७ रोजी झालेल्या १७३व्या बैठकीतील ठराव क्र.७१२ अन्वये निर्गमित करण्यात आलेले सेवाप्रवेश नियम पुनः सुधारीत करण्याबाबत सुचविले. त्यानुसार प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये योग्य ती सुधारणा करण्यात येईल.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजुर केला :-**

**ठराव क्र. १३०३ :**

“**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उप-कलम (३) चे पोट-कलम (एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे, बाब टिप्पणीमध्ये उल्लेख केलेल्या प्रस्तावानुसार श्रीमती के. विजयालक्ष्मी, अति. प्रमुख (उमटा) यांचा

..१९/-

परिवहन क्षेत्रातील १५ वर्षाचा अनुभव ग्राहय धरुन त्यांची प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदावर करण्यात आलेल्या पदोन्नतीस याव्दारे कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ७ : मेट्रो मार्गाच्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील मुख्य अभियंता (स्थापत्य) - मेट्रो या पदावरील नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देण्याबाबत.**

७.१ या विषयाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकरणाच्या १३८व्या बैठकीतील ठराव क्र.१३३८ अन्वये प्राधिकरणाच्या आस्थापनेवर नव्याने निर्माण करण्यात आलेल्या पदांपैकी "मुख्य अभियंता (स्थापत्य) मेट्रो" संवर्गातील पदे त्वरीत भरणे आवश्यक असल्यामुळे दिनांक २९ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २४६व्या बैठकीतील ठराव क्र.१२९२ अन्वये सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमास आणि सदर पदे भरण्याच्या दृष्टीने विभागीय पदोन्नती निवड समिती गठीत करण्यास मंजूरी देण्यात आली. तसेच सदर पदे भरण्याकरीता महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. त्यानुसार "मुख्य अभियंता (स्थापत्य) मेट्रो" या पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार जाती - ०१, अनुसूचित जमाती-०१ आणि खुला-०२ अशी एकूण ०४ पदे सरळसेवेने / प्रतिनियुक्तीने भरण्याकरीता वृत्तपत्रांमध्ये दिनांक २८ डिसेंबर, २०१५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन अर्ज मागविण्यात आले होते. कार्यकारी समितीच्या दिनांक २९.१०.२०१५ रोजी झालेल्या २४६व्या बैठकीतील ठराव क्र.१२९२ अन्वये गठीत करण्यात आलेल्या निवड समितीमध्ये प्रमुख, अभियांत्रिकी विभाग यांचा समावेश करण्यात आला होता. मात्र दरम्यानच्या कालावधीत प्रकल्प (संचालक) मेट्रो या पदावर नियुक्ती करण्यात आलेली असल्यामुळे व मेट्रो प्रकल्पाचे कामकाज प्रकल्प (संचालक) मेट्रो यांच्या अधिपत्याखाली सुरु असल्यामुळे "मुख्य अभियंता (स्थापत्य) मेट्रो" या पदाकरीता गठीत करण्यात आलेल्या निवड समितीमध्ये प्रमुख, अभियांत्रिकी विभाग यांचेऐवजी प्रकल्प (संचालक) मेट्रो यांचा समावेश असलेली सुधारीत निवड समिती कार्यकारी समितीच्या मंजूरीच्या अधिन राहून गठीत करण्यात आली.

..२०/-

७.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, "मुख्य अभियंता (स्थापत्य) मेट्रो" या पदाकरीता पात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांच्या सुधारीत निवड समितीमार्फत मुलाखती घेण्यात आल्या. निवड समितीने शैक्षणिक अर्हता, मेट्रोसंबंधी कामाचा अनुभव, पात्रता व योग्यता या सर्व बाबीचा विचार करुन एकमताने "मुख्य अभियंता (स्थापत्य) मेट्रो" या पी.बी. - IV रु.३७,४००-६७,००० + ग्रेड पे रु.८,९००/- या वेतनश्रेणीतील पदावर श्री.बसवराज मा. भद्रगोंड यांची सरळसेवेने आणि दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन या कार्यालयामध्ये वरिष्ठ उप-महा व्यवस्थापक / स्थापत्य या पदावर कार्यरत असलेले श्री. तानाजी कृ. भोसले यांची प्रतिनियुक्तीने नेमणूक करणेची शिफारस केली. त्यानुसार "मुख्य अभियंता (स्थापत्य) मेट्रो" या पदावर सरळसेवेने नेमणूकरीता श्री.बसवराज मा. भद्रगोंड यांना नियुक्ती देकारपत्र निर्गमित करण्यात आले असून श्री. तानाजी कृ. भोसले, वरिष्ठ उप-महा व्यवस्थापक / स्थापत्य यांच्या प्रतिनियुक्तीने नेमणूकीकरीता दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन या कार्यालयास पत्र पाठविण्यात आले आहे. "मुख्य अभियंता (स्थापत्य) मेट्रो" वेतनश्रेणी पी.बी.-IV रु.३७,४००-६७,००० + ग्रेड पे रु.८,९००/- या पदाकरीता महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने गठित करण्यात आलेल्या सुधारीत निवड समितीस व निवड समितीच्या अहवालास तसेच निवड समितीने शिफारस केलेले श्री.बसवराज मा. भद्रगोंड यांची "मुख्य अभियंता (स्थापत्य) मेट्रो" या पदावर सरळसेवेने आणि दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन या कार्यालयातील वरिष्ठ उप-महाव्यवस्थापक / स्थापत्य पदावर कार्यरत असलेले श्री. तानाजी कृ. भोसले, यांची प्राधिकरणामध्ये प्रतिनियुक्तीने नेमणूकीसंबंधी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्याबाबत प्रस्ताव कार्यकारी समितीपुढे सादर करण्यात आला.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजुर केला :-**

**ठराव क्र. १३०४ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** "मुख्य अभियंता (स्थापत्य) मेट्रो" या पदावर नेमणूक करण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या सुधारीत निवड समितीस मंजूरी देण्यात येत आहे. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ (३) (एक) च्या अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे मुख्य अभियंता (स्थापत्य) मेट्रो पी.बी.-IV रु.३७,४००-६७,००० + ग्रेड पे रु.८,९००/- या वेतनश्रेणीतील पदावरील निवड समितीच्या अहवालास, तसेच सदर अहवालानुसार "मुख्य

..२१/-

अभियंता (स्थापत्य) मेट्रो" या पदावर श्री.बसवराज माडेप्पा भद्रगोंड यांची सरळसेवेने आणि श्री. तानाजी कृष्णराव भोसले, वरिष्ठ उप-महाव्यवस्थापक / स्थापत्य, दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांची प्राधिकरणामध्ये प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यासंबंधी केलेल्या कार्यवाहीस याव्दारे कार्योत्तर मंजूरी देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ८ : श्री. उमेश लुकतुके, तत्कालीन प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांच्या विरुध्द शिस्तभंग विषयक चौकशी अधिकाऱ्याने सादर केलेला चौकशी अहवाल मान्यतेकरीता सादर.**

८.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगीतले की, श्री. उमेश लुकतुके तत्कालीन प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यास कार्यकारी समितीने दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या २४४व्या बैठकीत ठराव क्र.१२७९ अन्वये मंजूरी देण्यात आली असून श्री. व्ही. डब्ल्यु. देशपांडे, माजी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र शासन यांची "चौकशी अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यास व श्री. पी. एम. यादव, वरिष्ठ नियोजक, नगर व क्षेत्र नियोजन विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची "सादरकर्ता अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार, श्री. व्ही. डब्ल्यु. देशपांडे, चौकशी अधिकारी यांनी श्री. लुकतुके, तत्कालीन प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांची चौकशी करण्यात येऊन चौकशी अहवाल दिनांक ३१.०३.२०१६ रोजी महानगर आयुक्त यांना सादर केलेला आहे. चौकशी अहवालाच्या शेवटी त्यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढला आहे :-

"It cannot be conclusively held, that Mr.Luktuke is guilty of the charges leveled against him by MMRDA."

८.२ महानगर आयुक्त यांनी असेही नमुद केले की, उपरोक्त चौकशी अहवाल कार्यकारी समितीस मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला आहे. सदर चौकशी अहवालास कार्यकारी समितीची मान्यता मिळाल्यानंतर चौकशी अहवाल शासनाच्या नगर विकास विभागाकडे पाठविण्यात येईल.

८.३ चर्चेनंतर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीच्या सर्व सदस्यांना चौकशी अहवालाच्या प्रती सीलबंद लखोटयात पाठविण्यात याव्यात व हा विषय पुढील बैठकीत पुन्हा सादर करण्यात यावा.

..२२/-

**बाब क्र. ९ :** **राज्य सार्वजनिक उपक्रमांच्या अतिरिक्त निधीची गुतवणूकी संदर्भातील सुधारित मार्गदर्शक तत्वे / सूचना.**

९.१ महानगर आयुक्त यांनी शासन निर्णय क्र.शासाउ-१०.१५/प्र.क.४२/सा.उ., दिनांक २७.१०.२०१५ रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयाची माहिती कार्यकारी समितीपुढे विषद केली. सदर शासन निर्णयात राज्य शासनाने सार्वजनिक उपक्रमांनी आणि काही महामंडळांनी त्यांच्याकडील अतिरिक्त निधी गुंतविताना केलेल्या कार्यप्रणालीचा व प्रक्रियेचा संपूर्ण आढावा घेत शासनास निधी सुरक्षित राहून योग्य त्या पध्दतीने गुंतविला जावा म्हणून सन २००६ पासूनच्या वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे व सूचनांचे संकलन करुन सर्व समावेशक असा एकत्रितपणे सुधारित शासन निर्णय दिनांक २७.१०.२०१५ रोजी निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णय क्र.शासक्र.१०.१५/प्र.क्र./४२/सा.उ. अन्वये यापूर्वी निर्गमित केलेले दिनांक १३.०३.२००६, दिनांक २२.०३.२००६, दिनांक ०१.०७.२०१० व दिनांक २४.०७.२०१४ रोजीचे शासन निर्णय/ परिपत्रक अधिक्रमित करण्यात आले आहेत.

९.२ महानगर आयुक्त यांनी असेही नमूद केले की, सदरहू शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येक उपक्रमाने वरील मार्गदर्शक सूचना / तत्वे संचालक मंडळाच्या पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर करावीत आणि काटेकोरपणे पालन / अंमलबजावणी होत आहे याची खातरजमा करावी असे निर्देश दिले आहेत. त्यानुसार गुंतवणूकीसंदर्भातील मार्गदर्शक सूचना कार्यकारी समितीपुढे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे. तसेच प्राधिकरणाचा अतिरिक्त निधी गुंतविताना खबरदारीचे अतिरिक्त उपाय म्हणून खाजगी क्षेत्रातील बँका / वित्तीय संस्था यांच्याकडे निधी गुंतविताना प्राधिकरणाच्या एकूण गुंतवणूकीच्या २०% पेक्षा अधिक नाही इतकी कमाल मर्यादा, खाजगी क्षेत्रांमधील बँका /वित्तीय संस्था यांच्यातील गुंतवणूकीकरीता पाळण्यात येत आहे.

**निर्णय :** **कार्यकारी समितीने सदरहू शासन निर्णयाची तसेच खाजगी बँकामधील कमाल २०% इतक्या गुंतवणूकीच्या मर्यादेची नोंद घेतली.**

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

----------xox----------